# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/०१/२०२६ (शुक्रवार )**

## पर्यावरणास अपायकारक तसेच जिवीतास धोकादायक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजा वापरून पतंग उडविणाऱ्या तसेच विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०७ गुन्हे नोंद

## ४६ नग नायलॉन मांजा चक्रीसह २८ हजार ८०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

**दिनांक ०८/०१/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात पर्यावरणास अपायकारक तसेच जिवीतास धोकादायक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजा वापरून पतंग उडविणाऱ्या तसेच विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध खालील प्रमाणे ०७ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**

**पोस्टे कन्हान :—** कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा पिपरी येथील आनंद बोरकर यांचे गच्चीवर **आरोपी नामे योगेश आनंदराव बोरकर, वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्रं ७, पिपरी कन्हान** हा नॉयलॉन मांजाचा वापर करून पतंग उडवित आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे कन्हान पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले असता आरोपी हा नॉयलॉन मांजानी पतंग उडविताना मिळाल्याने पंचासमक्ष आरोपीचे ताब्यातून नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ५०० /— रूपये जप्त करण्यात आला.

**पोस्टे बोरी :—** बोरी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा वार्ड क्र. ०२ बोरी येथे **वैभव बबन खोपाळ, वय १९ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, बुट्टीबोरी तालुका जिल्हा नागपुर** हा प्रतिबंधित नायलॉन मांजा बाळगुन आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे बोरी पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी पोहचुन पंचासमक्ष झडती घेवुन आरोपीचे ताब्यातून एकुण ०५ नग नायलॉन मांजा लाकडी चक्रीसह किंमती २,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**पोस्टे नरखेड :—** नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, इंदीरा नगर नरखेड येथे **आरोपी क्र. १) करीम मोहम्मद शेख, वय ६२ वर्ष, रा. इंदीरा नगर नरखेड** याचेकडे प्रतिबंधित नायलॉन मांजा विक्री करीता आणलेला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे नरखेड पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले असता आरोपी करीम शेख याचे ताब्यात प्रतिबंधीत नायलॉन मांजा मिळुन आला नमुद आरोपीकडे चौकशी केली असता त्याने विक्री साठी आणलेला नायलॉन मांजा आरोपी कं **०२) मंगेश भागवानजी रेवतकर, रा. इंदीरानगर नरखेड, तह. नरखेड, जि. नागपुर** याचे घरी ठेवला असल्याचे सांगितल्याने पंचासमक्ष आरोप कं २ घरझडती घेतली असता १६ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ९६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**पोस्टे कळमेश्वर :—** कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, वार्ड क्र. ४ गोंडखैरी कळमेश्वर येथे **एक विधीसंघर्षग्रस्त बालक** हा नायलॉन मांजानी पतंग उडवित आहे. मिळालेल्या माहीतीच्या पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचुन पाहणी केली असता नमुद **विधीसंघर्षग्रस्त** बालक हा नायलॉन मांजानी पतंग उडविताना मिळुन आला. पंचासमक्ष १ नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ६०० /— रूपये जप्त करण्यात आला.

**पोस्टे सावनेर :—** सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, वार्ड क्र. १३ मूरलीधर मंदीर जवळ , सावनेर येथे **विधीसंघर्ष बालक** हा आपले राहते घरी नायलॉन मांजाची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे सावनेर पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचुन पंचासमक्ष घरझडती घेतली असता १५ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह मिळुन आला.एकुण १०,५००/— रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.

**पोस्टे पारशिवनी :—** पारशिवनी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा घोगरा रोड येथे **आरोपी किसना रविंद्र पाटील, वय ३४ वर्ष, रा. घोगरा रोड, पारशिवनी** हा प्रतिबंधित नायलॉन मांजाची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पारशिवनी पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले असता आरोपी च्या ताब्यात प्रतिबंधीत नायलॉन मांजा मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन १ नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ७५०/— रूपये असा एकुण ७५०/— रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.

**पोस्टे रामटेक** :— रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली केके नगर, शितलवाडी, ता. रामटेक, जि. नागपुर येथे **आरोपी नामे रविंद्र भिमराव शिंगाडे वय ५२ वर्ष जात महार रा केके नगर शितलवाडी ता रामटेक जि नागपुर** हा प्रतिबंधित नायलॉन मांजा विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी पोहचुन पंचासमक्ष झडती घेतली असता ७ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह मिळुन आल्याने किंमती ४,४०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वर नमुद आरोपीतांनी नॉयलॉन मांजा पर्यावरणास तसेच जिवतीस धोकादायक असुन शासनाव्दारे प्रतिबंधित केला असतांना सुध्दा स्वत:च्या मौजमजेसाठी तसेच आर्थिक फायदयासाठी नायलॉन मांजा विक्री साठी तसेच पतंग उडविण्यासाठी वापर केल्याने नमुद आरोपीविरूध्द कलम १२५, २२३ भा.न्या.सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये ०७ गुन्हे नोंद करण्यात आले आहे. वरील कारवाईमध्ये एकुण ४६ नग नायलॉन मांजा चक्री किंमती २८,८५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

## अवैध व्यवसायात सक्रीय २३८ वाहनांचे परवाने रद्द करण्याबाबत तसेच २९ वाहनांना ब्लॅकलिस्ट करण्याबाबत प्रस्ताव रवाना नागपुर ग्रामीण पोलीसांनी कामगिरी

नागपुर ग्रामिण जिल्हयात गोवंश ,बकरी या प्राण्याची तस्करी तसेच चोरी ,मोटर पंप चोरी अश्या गुन्हयांमध्ये वापरलेल्या वाहनांचा वापर तात्काळ थांबविण्यात यावा आणि अश्या प्रकारच्या कृत्यांमध्ये गुंतलेल्या वाहनावर कायदेशिर प्रतिबंधक कार्यवाही व्हावी, याकरीता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नमुद गुन्हयात वापरण्यात आलेल्या वाहनाचे परवाने रदद् करण्यात यावे **याकरीता २३८ वाहनांचे परवाने रद्द करण्याबाबत तसेच २९ वाहनांना ब्लॅकलिस्ट करण्याबाबत प्रस्ताव संबधीत प्रादेशिक परीवहन अधिकारी, परिवहन कार्यालय, यांचे कडे रवाना करण्यात आले आहे. तसेच यापुढेही अवैध धंदयामध्ये वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर अशीच कठोर कायदेशिर कारवाई करण्यात येईल.**

## नागपुर ग्रामीण पोलीसांतर्फे भिवापुर — चिखली मार्गाला जोडलेल्या महामार्गावर सुरक्षेसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजाना बाबत...

दिनांक ०३/०१/२०२६ चे एका वृत्तपत्रात ५ किमी मार्ग मे आए दिन होते है सडक हादसे , भिवापुर — चिखली वडद सडक को शिघ्र दुरूस्त करणे की मांग अशा शिर्षकाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. **सदर प्रकरणाची सविस्तर माहिती अशी आहे की, सदर ५ किलोमिटर मार्गावर मागील ३ वर्षात अपघातांमुळे मृत्यू झाल्याची कोणत्याही घटनेची नोंद नाही. नमुद मार्गाला जोडलेल्या महामार्गावर नागपूर ग्रामीण पोलीस सतत विशेष मोहीम राबवुन वेगमर्यादा उल्लंघन, चुकीच्या दिशेने वाहन चालविणे तसेच हेल्मेट व सीट बेल्ट न वापरणे, मदयपान करून वाहन चालविणे यांसारख्या गंभीर वाहतूक उल्लंघनांवर कारवाई करीत आहे.**

## नागपुर ग्रामीण पोलीसांतर्फे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ वर सुरक्षेसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजानाबाबत...

दिनांक ०५/०१/२०२६ चे एका वृत्तपत्रात महामार्ग आहे की, मृत्युचा सापळा ? अशा शिर्षकाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. **सदर प्रकरणाची सविस्तर माहिती अशी आहे की, नागपुर ग्रामीण हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ (मनसर —रामटेक — भंडारा) या मार्गावरील अपघातांमुळे मृत्यूंच्या संखेत सन २०२३ च्या तुलनेत सन २०२४ मध्ये आणि सन २०२५ मध्ये ३५ टक्के अशी लक्षणिय घट झाली आहे.**

**नमुद राष्ट्रीय महामार्गावर नागपूर ग्रामीण पोलीस सतत विशेष मोहीम राबवुन वेगमर्यादा उल्लंघन, चुकीच्या दिशेने वाहन चालविणे तसेच हेल्मेट व सीट बेल्ट न वापरणे, मदयपान करून वाहन चालविणे यांसारख्या गंभीर वाहतूक उल्लंघनांवर कारवाई करीत आहे. यासोबतच, या राष्ट्रीय महामार्गावरील आवश्यक असलेल्या रस्ते अभियांत्रिकी सुधारणांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD–NH) यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे.**

## पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ३ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन रामटेक** :— रामटेक पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रं १ सम्यक प्रमोद ढवळे, रा. मंगळवारी, ता. रामटेक, जि. नागपुर हा गहु तलावाच्या परीसरात सार्वजनीक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. आरोपी क्रं. २. मनोज रामदास चिन्नुरकर, वय ३३ वर्ष, रा. रामाळेश्वर वार्ड, हा पंचायत समितीसमोर आणि आरोपी क्रं ३ विजय संतोशी बनवासी, रा. खंडाळा ता पारशिवनी जि नागपुर, हा मनसर स्मशान भुमी येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने नमुद आरोपीवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये प्रत्येकी १ असे ३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०६ गुन्हे नोंद

दिनांक ०८/०१/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू तसेच ईतर साहीत्य असा एकुण ३,२१०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा अंतर्गत आरोपी** महीला आरोपी हीचेवर **१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही अंतर्गत आरोपी** निखील विजय वानखेडे, वय २५ वर्षे, रा. वार्ड क्र ०१ कुही ता.कुही, याचेवर **१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कन्हान** येथे अमीत नागोराव गजभिये वय ३० वर्ष रा. पुराना गोंडेगांव कन्हान, ता. पारशिवनी याचेवर १ गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी १. महेश शंकरराव कळसकर,रा. रिधोरा, काटोल जि नागपुर आणि आणि २. नरेन्द्र गंगाधर गजभिये, रा. रिधोरा काटोल जि नागपुर यांचेवर **प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे**, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे संदीप आंनदराव दुपारे वय ३५ वर्ष, रा. आग्रा, ता. नरखेड याचेवर **गुन्हा नोंद आहे** अशा ६ **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ६ गुन्हे दाखल केले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने